# ८. कुंदाचे साहस

पावसाळ्याचे दिवस होते. झाडे, शेते सर्वच हिरवीगार झाली होती. सर्वत्र प्रसन्न वातावरण होते. गावातल्या सोना नदीला भरपूर पाणी आले होते. पावसामुळे नदीचा प्रवाह वाढत होता.

आज रविवार. कुंदाच्या शाळेला सुट्टी होती. सुट्टीचा दिवस असल्यामुळे कुंदा आणि तिच्या मैत्रिणी नदीच्या काठावर खेळायला गेल्या होत्या. कुंदा वयाच्या आठव्या वर्षीच पोहायला शिकली होती. पाहता पाहता ती पट्टीची जलतरणपटू बनली होती. नदीकाठच्या कडूनिंबाच्या मोठ्या झाडाखाली सगळ्या मैत्रिणी हासत-बागडत खेळत होत्या. दूरवर शेतात शेतकरी व काही बायका कामात मग्न होत्या.



खेळता खेळता लहानगी रझिया व नीला नदीकडे केव्हा गेल्या, ते कळलेच नाही. इकडे कुंदा व तिच्या मैत्रिणी खेळण्यात दंग होत्या. एवढ्यात नीलाचा मोठमोठ्याने रडण्याचा व ओरडण्याचा आवाज आला. 'धावा! धावा! लवकर या, रझिया पाण्यात पडली.' 'कुणीतरी वाचवा हो!' ही हाक कुंदाच्या कानावर पडल्याबरोबर ती धावतच नदीकिनारी पोहोचली. आजूबाजूचे लोक आवाज ऐकून नदीकडे धावू लागले. मुलींचा गलका वाढला होता. कुंदा धावत येऊन काठावर क्षणभर उभी राहिली. रझिया पाण्यात गटांगळ्या खात पाण्याच्या प्रवाहाबरोबर पुढे पुढे वाहत चालली होती.



कुंदाने क्षणात नदीच्या पात्रात उडी घेतली व सरसर पोहत रझियाच्या दिशेने निघाली. तोवर आजूबाजूचे लोक जमा झाले. 'अरेऽ अरेऽ रझिया बुडते आहे. एवढीशी कुंदा तिला कशी वाचवणार?' लोक जोरजोरात ओरडत होते, 'कुंदा, पाण्याचा वेग वाढतो आहे. माघारी फीर.' जमलेली माणसे ओरडत होती. कुंदाला फक्त रझिया दिसत होती. कसेही करून तिला वाचवायचे एवढाच विचार तिच्या मनात होता. कोणाचेही शब्द तिच्या कानावर पडत नव्हते. भरभर पोहत कुंदा रझियाजवळ पोहोचली. रझिया घाबरली होती. तिच्या नाकातोंडात पाणी गेले होते. 'रझिया घाबरू नको, मी आले आहे. आता फक्त माझ्या दंडाला घट्ट धर.'

कुंदाने रझियाला काठाकडे आणले. तोवर लोकांनी मोठा दोर पाण्यात सोडला होता. कुंदाने त्याला धरले. सर्वांनी या दोघींना बाहेर काढले. ही बातमी गावभर पसरली.

ही बातमी रझियाच्या घरीही पोहोचली. तिची आई धावत आली. त्या दोघी सुखरूप पाहून तिने दोघींना घट्ट कवटाळले. तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. 'कुंदा, आज तुझ्यामुळेच माझ्या रझियाचा जीव वाचला. केवढी धाडसी मुलगी आहेस तू!'

रझियाने कुंदाला मिठी मारली. तोवर कुंदाचे आई-बाबा आले होते. कौतुकाने व अभिमानाने त्यांनी मुलीला जवळ घेतले. आज साऱ्या गावात कुंदाच्या साहसाचीच चर्चा होती. साऱ्यांच्या कौतुकाच्या वर्षावाने कुंदा आनंदून गेली.

**शब्दार्थ :** **पट्टीची जलतरणपटू** – पोहण्यात एकदम तरबेज असलेली. **मग्न, दंग असणे** – गुंग असणे. **गलका वाढणे** – आवाज वाढणे. **गटांगळ्या खाणे** – पाण्यात वर-खाली होण्याची क्रिया. **माघारी** – मागे. **सुखरूप** – सुरक्षित. **कवटाळणे** – मिठी मारणे.

## स्वाध्याय



**प्र. १. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) झाडे, शेते हिरवीगार कशामुळे झाली होती?

(आ) कुंदा केव्हा पोहायला शिकली होती?

(इ) कुंदाला नदीवर कोणते दृश्य दिसले?

(ई) नदीच्या काठावरचे लोक कुंदाला कोणत्या सूचना देत होते?

(उ) रझियाच्या आईच्या डोळ्यांतून आनंदाश्रू का आले?

**प्र. २. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | |
|---|---|
| (अ) प्रसन्न × | (ई) हसणे × |
| (आ) दूरवर × | (उ) पुढे × |
| (इ) शूर × | (ऊ) लवकर × |

**प्र. ३. पोहण्यामध्ये तरबेज असलेल्या व्यक्तीला 'जलतरणपटू' म्हणतात. या प्रकारचे खालील शब्द वाचा व त्यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) क्रिकेट खेळण्यात पटाईत | (१) वक्ता |
| (आ) धावण्यात पटाईत | (२) क्रिकेटपटू |
| (इ) भाषण करण्यात पटाईत | (३) धावपटू |

**प्र. ४. खालील खेळ खेळण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू/गोष्टी लिहा.**

| | |
|---|---|
| (अ) क्रिकेट – | (उ) संगीतखुर्ची – |
| (आ) कबड्डी – | (ऊ) विटीदांडू – |
| (इ) फुटबॉल – | (ए) लगोरी – |
| (ई) लिंबूचमचा – | (ऐ) पोहणे – |

**प्र. ५. कंसातील वाक्प्रचार दिलेल्या वाक्यांत योग्य ठिकाणी वापरा.**
**(दंग होणे, गलका वाढणे.)**


(अ) शाळेची सुट्टी झाल्याबरोबर शाळेच्या मैदानात विद्यार्थ्यांचा ............ वाढला.

(आ) परीक्षा असल्यामुळे मुले अभ्यासात ............ झाली.

**प्र. ६ आंतरजालाचा उपयोग करून भारतीय जलतरणपटू यांची माहिती घ्या. प्रत्येक खेळाडूची माहिती चार–पाच वाक्यांत लिहा.**

**प्र. ७. तुम्ही रझियाचे 'हितचिंतक' आहात, या नात्याने तिला कोणत्या सूचना द्याल?**

**प्र. ८. पाठ वाचून तुम्हांला कुंदाचे कोणकोणते गुण जाणवले ते लिहा.**




**प्र. ९. कुंदाचे अभिनंदन करणारा कोणता संदेश तुम्ही भ्रमणध्वनीवरून पाठवाल ते खालील चौकोनात लिहा.**

---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

### वाचू आणि हसू.

**आई :** किती वेळा तुला सांगायचं, त्या डब्याजवळ जाऊ नकोस म्हणून!

**आशू :** आता नाही सांगावं लागणार. आता त्या डब्यातले लाडू संपले आहेत.

एक वेडा गाढवावर बसून जात असतो. दुसरा वेडा त्याला थांबवतो अन् विचारतो, ''अरे, हेल्मेट का नाही घातलंस?''

तेव्हा पहिला वेडा म्हणतो, ''अरे, नीट बघ ना खाली. फोर व्हिलर आहे फोर व्हिलर!''

### आपण समजून घेऊया.


- **खालील शब्दसमूह वाचा.**

सुंदर फुले, गोड आंबा, उंच डोंगर, ताजे दूध, पिवळा झेंडू, सात केळी, लांब नदी, अवखळ मुले.

वरील शब्दसमूहात फुले, आंबा, डोंगर, दूध, झेंडू, केळी, नदी, मुले ही नामे आहेत, तर सुंदर, गोड, उंच, ताजे, पिवळा, सात, लांब, अवखळ हे शब्द त्या नामांबद्दल विशेष माहिती सांगणारे शब्द आहेत. **अशा शब्दांना विशेषण म्हणतात.**

**शिक्षकांसाठी :** पाठातील कोणत्याही एका परिच्छेदाचे अनुलेखन व श्रुतलेखन करून घ्यावे.

- खालील आकृतीत गुलाबाच्या फुलाला आठ विशेषणे लावली आहेत. ती समजून घ्या.




- खालील चित्रांना दोन-दोन विशेषणे लावा.



__________

__________



__________

__________



__________

__________



__________

__________

- खालील वाक्ये वाचा.

(अ) अरेरे! तू पडलास.

(आ) शाबास! छान खेळलास.

(इ) अरे वाह! छान कपडे आहेत.

उत्कट भावना व्यक्त करताना ती दाखवणाऱ्या शब्दांच्या शेवटी '!' असे चिन्ह देतात. **या चिन्हास उद्‌गारचिन्ह म्हणतात.**